

Kk;hfkf

# हरिश्चंद्रगड

## (वाट डाव्या नळीची)


लेखक :

**विशाल अडखळे**

(गोराईकर मावळे ट्रेकर्स)

# हरिश्चंद्रगड

## (वाट डाव्या नळीची)

विशाल चंद्रकांत अडखळे

ई साहित्य प्रतिष्ठान

पुस्तकाचे नाव : हरिश्चंद्रगड (वाट डाव्या नळीची)

प्रकार : प्रवासवर्णन, ट्रेकवर्णन

लेखक : विशाल चंद्रकांत अडखळे

छायाचित्रे : स्वप्निल लोंढे, राहूल मंचेकर

विशेष आभार : दिनेश वालावलकर, गोराईकर मावळे ट्रेकर्स ग्रुप

सौजन्य/नकाशा सौजन्य : Google, Wikipedia, Trekshitiz

विशाल चंद्रकांत अडखळे
29-B/5, गोराई, बोरिवली (प.),
मुंबई, महाराष्ट्र.
पिन कोड - 400 091.
Mob No.:- 8976384304
Email:- vishal02ad@gmail.com
goraikarmavle@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे आणि फोटोंचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असुन पुस्तकाचे किंवा त्यातील अंशता माहितीचे किंवा फोटोंचे पुर्नमुद्रण व नाटय चित्रपट किंवा इतर रूपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे आणि तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for

registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ____________

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता.
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# हरिश्चंद्रगड
## (वाट डाव्या नळीची)

### हे पुस्तक विनामूल्य आहे पण फ़ुकट नाही.

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट.

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

**असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.**

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.

### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.



## लेखकाचे मनोगत

नमस्कार मित्रांनो! मी सर्वप्रथम ई साहित्य प्रतिष्ठान टीमचे मनापासून आभार व्यक्त करतो, त्यांनी नवोदित लेखकांना दिलेल्या प्रोत्साहानामुळेच मी आज आपल्या समोर आहे.

मला लहानपणापासूनच शिवरायांच्या इतिहासाची आणि निसर्गात भ्रमंती करण्याची आवड आहे, आणि त्यातूनच मग गड-किल्ल्यांची भटकंती सुरू झाली. पुढे मग स्वप्निल, मॅडी आणि सिध्दूला सोबत घेऊन "गोराईकर मावळे ट्रेकर्स" या ग्रूपची संकल्पना अस्थित्वात आली. आता तर ग्रूप उंच भरारी घेण्याच्या तयारीत आहे.

मी व्यवसायाने वकिल जरी असलो तरी मनाने आणि शरीराने मावळा होऊन महाराष्ट्राच्या दऱ्या-खोऱ्यात "गोराईकर मावळे ट्रेकर्स" ग्रूपसोबत भरकटत

असतोच. मी केलेल्या गड-किल्ल्यांच्या भटकंती, प्रवासातील अनुभव आणि थरार तुमच्या समोर मांडण्याचा प्रयत्न करीत राहीन.

"हरिश्चंद्रगड (वाट डाव्या नळीची)" या पुस्तकाच्या रूपाने तुमच्यासमोर ट्रेकवर्णन सादर करण्याचा माझा हा पहिलाच प्रयत्न. या पुस्तकात हरिश्चंद्रगडावर जाणाऱ्या डाव्या नळीच्या वाटेचा प्रवासवर्णन करण्यात आलेला आहे.

धन्यवाद.

जय शिवराय!

-विशाल चंद्रकांत अडखळे.

विशाल चंद्रकांत अडखळे
29-B/5, गोराई, बोरिवली (प.),
मुंबई, महाराष्ट्र.
पिन कोड - 400 091.
Mob No.:- 8976384304
Email:- vishal02ad@gmail.com
goraikarmavle@gmail.com

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

# ई साहित्य प्रतिष्ठान



दरवर्षी प्रमाणे डिसेंबर महिना जवळ आला की आमच्या ग्रुप मध्ये कॅम्पिंग ट्रेकला जायची चर्चा सुरु होते. मग काहीतरी भन्नाट प्लॅन करायचा ठरवण्यात आला. जायचं हरिश्चंद्रगडावर नळीच्या वाटेने. खिरेश्वर आणि पाचनई मार्गाने जाण्यात मजा नाही म्हणून आम्ही नळीच्या वाटेने जायचा बेत आखला.

हरिश्चंद्रगड म्हणजे ट्रेकर्सची पंढरीच म्हणावी लागेल कारण नवख्या ट्रेकर्स पासून ते अनुभवी क्लायंबर्स पर्यंत सर्वांनाच खुणावत असतो. नळीच्या वाटेचा थरार, कोकणकड्यावरचा सूर्यास्त, गडावरील देवतांची पौराणिक मंदिरे, तारामती शिखरासारखे महाराष्ट्रातील दुस-या क्रमांकाचे शिखर. हे सर्व म्हणजे ट्रेकर्ससाठी एक वेगळी पर्वणीच.

मी, स्वप्निल लोंढे, अक्षय आग्रे (मॅडी), सिद्धेश धामापूरकर (सिध्दू), निलेश अग्रवाल (भैया), दिनेश वालावलकर, अनिकेत मंचेकर आणि राहूल मंचेकर असे आमच्या गोराईकर मावळे ग्रूपचे शिलेदार लागलो पुढच्या तयारीला.

या ट्रेकला सर्वात चांगली गोष्ट होती आणि ती म्हणजे आम्ही सर्व आठही जण एकत्र असणार होतो. पण जशी आयत्या वेळी पोरांना टांग देण्याची सवय लागलेली असते, तशीच आमच्या ग्रुपच्या बाबतीत पण आहे. तरी यावर तोडगा काय? तर आम्ही सर्व पोरांकडून Advance जमा केले होते आणि मग झाला प्लॅन Successful!



# रात्र पहीली - 22 डिसेंबर 2017

दिनांक 22 डिसेंबर 2017, शुक्रवार रोजी आमचा हरिश्चंद्रगडावर जायचा दिवस उजाडला. सगळे कामावर असल्याकारणाने रात्री 8.00 वाजता गोराईत भेटण्याचे ठरवले आणि सगळयात महत्वाचे म्हणजे आधीच सगळे वेळेवर येऊन माझ्या घरी हजर आणि मी अजून होतोय तयार! मंचेकर बंधूंना डायरेक्ट कल्याण एसटी स्टॅंडवर भेटण्यास सांगितले. आम्ही बाकीचे सहा जण 10.50 वाजता कल्याण एसटी स्टॅंडला येऊन पोचलो.



दादर कल्याण लोकलचा प्रवास...

कल्याण एसटी स्टॅंड ला पोहचतोय तर काय, तिथे नुसती जत्राच भरली होती. ट्रेकिंगला जाणा-या पोरांचे वेगवेगळे ग्रुप घोळके करुन उभे होते. कल्याणवरुन अहमदनगरला जायला दर अर्ध्या-एक तासाने माळशेज घाटमार्गे

गाड्या असतात. शेवटची गाडी ही 12.00 ची असते असे आम्हाला चौकशी अंती त्या पिंज-यात बसवलेल्या कुस्कट माणसाकडून कळाले.

रात्री 11.30 च्या सुमारास अहमदनगर-पाथार्डी गाडी आली आणि सगळी पोरं धडाधड एकावर एक उड्या टाकून धावत सुटली. मी आणि स्वप्निल ने आमच्या बॅगा तश्याच मागे सोडून गाडीत उड्या टाकल्या आणि शेवटच्या सगळ्या सीट्स अडवून ठेवल्या. मागोमाग खिडकीतून आपल्या पोरांनी बॅगा आणल्या. कंडक्टर ने घंटी मारल्याबरोबर अनिकेत ने गणपती बाप्पाची आरोळी दिली आणि प्रवास सुरु झाला आमचा पुढच्या दिशेला...

रात्री 1.00 च्या सुमारास आम्ही मोरोशी फाट्यावर उतरलो आणि वल्हिवले म्हणजेच बेलपाड्याला जाण्यासाठी अगोदरच बोलणं झाल्याप्रमाणे जीपवाल्याला कॉल फिरवला. पण जीपवाल्याच्या गोंधळामुळे तो आमच्या बदली चुकून दुस-याच ग्रुपला घेऊन गेला होता. आता झाली फसगत आमची. मग पुन्हा कॉलच्या वा-या करुन शेवटी 2.00 वाजता जीपवाला आम्हाला पिकअप करायला आला. तोपर्यंत एका दुकानाच्या आडोश्याला बसून आम्ही मस्त सिध्दूने आणलेले पराठे आणि भैयाने आणलेली भाजी खाऊन घेतली.

रात्री 2.30 च्या सुमारास आम्ही वल्हिवले गावात पोहचलो. तर तिथे आमच्या स्वागताला एसटीचा लाल डब्बा आणि लाल टी-शर्ट घातलेला कामादादा उभाच होता. मग रात्री कामा दादाच्या घरातच मुक्काम झाला आमचा. आमच्या अगोदर तिथे दोन ग्रुप आले होते. त्यातला एक ग्रुप हा पुण्याहून आला होता आणि त्यांनी कामा दादाच्या अंगणातच पथा-या पसरल्या होत्या.

## दिवस पहिला - 23 डिसेंबर 2017

सकाळी 6.00 च्या दरम्यान आम्ही उठलो आणि कामादादा कडे चहा नाश्ता केला. एक बाकी आवडलं आणि ते म्हणजे कामादादाचा पाहुणचार.



कामादादाकडे सकाळी उरकून घेतलेला नाश्ता ...

सकाळी कामादादाच्या घरातूनच अजस्त्र अश्या कोकणकड्याचे आपल्याला दर्शन होते आणि हीच काय नळीची वाट पाहून मन रोमांचित झाल्याशिवाय राहत नाही.




कामादादाच्या घरातून दिसणारा कोकणकडा...

मग कामादादाचे योग्य ते मार्गदर्शन घेऊन आम्ही निरोप घेतला आणि निघालो पुढच्या प्रवासाला. तो पर्यंत 7.30 वाजले होते.



कामादादा सोबतची आठवण ...





वल्हिवले गावाचा निरोप घेतल्यावर ...

आता आमचा प्रवास सुरु झाला होता, नळीच्या वाटेच्या दिशेने. वरुन घाटातून येणा-या नदीच्या प्रवाहासोबत चालत गेलो की आपण नळीच्या वाटेकडे पोचतो. खरं तर हरिश्चंद्रगडावर जाण्यासाठी वल्हिवले गावातून दोन रस्ते आहेत. कोकणकड्याच्या डाव्या नळीची वाट आणि उजव्या नळीची वाट. डाव्या नळीची वाट ही उजव्या नळीच्या वाटेपेक्षा सोपी आहे. उजव्या नळीची वाट ही कठीण असून ती कोकणकडा आणि रोहिदास शिखराच्या मधून जाते. त्यात 40 फुटांचे रॉक पॅच आहेत. आम्ही निघालो **डाव्या** नळीच्या वाटेने, **ते पण गाईड न घेता**. आता इथूनच तर खरी गंमत चालू होते...




डाव्या नळीच्या वाटेचे दर्शन...



सरळसोट, रौद्र, भिषण कोकणकडा...

वल्हिवले गावापासून नळीच्या वाटेच्या तोंडाजवळ पोहचायला दीड तास पुरेसा असतो. पण आमची चालण्याची कला पाहता आम्हाला वेळ लागला. वाटेत नदीच्या आडोश्याला साचलेल्या पाण्याचे डबके पाहून आम्ही सगळे फ्रेश झालो आणि तिथेच प्रत्येकाने आपल्या घरच्यांना फोन करुन निरोप घेतला आणि यात चक्क आमचा एक-सव्वाएक तास फुकट गेला...



कोकणकडा Rangers...



कोकणकडा दर्शन...



आता आमचा प्रवास सुरु झाला होता पुढच्या दिशेला. मोठ-मोठ्या दगडांवरुन "मोगली" सारख्या उड्या मारुन आम्ही पुढे सरकत होतो. आणि पुढे त्यात मधेच आमचे नेहमीचे पेशंट बाजूला राहिले आणि आमच्या भाषेत अनिकेतचा Set Wet Citra होऊ लागला. बिचारा कसा-बसा फाफू करत जिद्दीने वर चढत होता. त्याचा धिर सुटत चाललेला पण जिद्द कायम होती. त्याला सावरुन मग आमची वाटचाल पुढे संथ गतीने सुरु झाली.



सह्याद्रीने अनिकेतची घेतलेली अशी ही परीक्षा...

दुपारी 1.00 च्या दरम्यान आम्ही डाव्या नळीच्या तोंडापाशी येऊन पोचलो.





नळीच्या वाटेवरचा प्रवेशद्वार...

डाव्या नळीच्या वाटेवर तीन रॉक पॅच लागतात. त्यात पहिला रॉक पॅच हा नवख्यांसाठीचा रॉक पॅच म्हणता येईल. दुसरा हा जवळपास 20 फुटांचा आहे आणि तिसरा हा जवळपास 15 फुटांचा असून त्यावर तिरका रॉक पॅच सर करावा लागतो.

दुपारी 1.15 च्या आसपास आम्ही जेवणासाठी बसलो आणि प्रत्येकाने घरुन आणलेले डब्बे उघडून त्यावर एकदाचा ताव मारला...



Break time...



लंचटाईम...



मॅडीचे (अक्षय) ओप्पो आणि थाळीपीठ सगळयात स्पेशल मेन्यू होता. स्वप्निलच्या अळूवड्या आणि अनिकेतच्या कोथिंबीर वड्या म्हणजे घरगुती मेवाच एकदम. सगळ्यांनी ठासून खाल्याबरोबर होणारा कचरा आपआपल्या बॅगेत ठेऊन निघालो पुढच्या प्रवासाला (इथे आमचा नियमच असतो की प्रत्येकाने आपला स्वतःचा कचरा ठेवण्यासाठी एक प्लॅस्टिक पिशवी ठेवायची आणि याचा फायदा म्हणजे निसर्गात कोठेही कचरा होत नाही आणि प्रत्येकाला चांगली शिस्तही लागते.)

आता दुपार झालेली... आमची चाल थोडी मंदावली होती....



राखणदार मॅडी...

आणि मागून स्वप्नील आणि मॅडी हे आमचे पिछाडीचे सैन्य, बाकीच्यांना शेळ्या मेंढ्या हाकलतात तसे पुढे पाठवत होते (आमच्या ग्रुपचा दुसरा नियम म्हणजे आम्ही कोणालाही स्वप्निल आणि मॅडीच्या पाठी राहू देत नाही आणि हे दोघंही माझ्या नजरेच्या टप्प्यातच असतात.)

सह्याद्रीने आपला राखटपणा कणखरपणा दाखवायला सुरवात केली होती आता प्रत्येकाची थोडी-फार प्रमाणात दमछाक होत होती आणि त्यात अजून भर म्हणजे आमचा पाठीवरचा संसार! प्रत्येकाला आम्ही Rank दिलेला. माझ्या मागे राहूल होता पण मध्येच त्याला काय व्हायचे की तो रस्ता सोडून भलत्याच रस्त्याला लागायचा आणि मग त्याच्या मागून येणा-या पोरांना पुन्हा त्रास.

## • पहिला रॉकपॅच :

पहिला रॉकपॅच हा सोपा असून त्याला रोपची गरज लागत नाही. इथे राहूल सर्वात पूढे होता ज्याला काही अनुभव नव्हता आणि माहितीही. शेवटी त्याची हौस फिटली ती तेव्हा, जेव्हा तो एका चुकीच्या मार्गाने वर जाऊन रॉक पॅचवर अडकला आणि मग सुरु झाला त्याचा आटापिटा... नंतर मग "भाऊ मला वाचव" या त्याच्या डायलॉग वरुन पोरांनी त्याची पुरतीच डावी-उजवी करुन टाकलेली...



## • दुसरा रॉकपॅच :



सुरवात दुसऱ्या रॉकपॅचची...

Youtube Link:- https://youtu.be/QsMO9FwDrlU

आमची संथ गतीने चालणारी वारी दुपारी 2.37 ला दुसरा रॉक पॅच (कातळकड्यावर) येऊन पोचली. हा रॉक पॅच जवळपास 20-25 फूटांचा आहे. सर्वप्रथम मी माझी बॅग आणि waist बॅग तिथेच ठेवली आणि खांद्यावर रोप घेऊन पहिला रॉक पॅच सर केला. वरती रोप बांधायला जागा नसल्याने मग मी तो रोप स्वतःभोवतीच गुंडाळून खाली सोडला आणि मग खालून स्वप्निल आणि

मॅडीने एक एकाच्या कंबरेला हार्नेस बांधून वर पाठवण्याचा प्रोग्राम चालू केला. तेवढ्यात माझे लक्ष कोकण कड्याच्या टोकाशी गेले. तिथे एक पोरगा आम्हाला तिस-या पॅचच्या मदतीसाठी विचारत होता. (*तो हॉटेल कोकणकडावाला होता ते आम्हाला सकाळी समजले*).

मी विचार केला तिसरा पॅच बघून येतो जर आवाक्यात येणार असेल तर मदत घ्यायची आवश्यकता नाही. बाकीच्या 3 पोरांना वर घेऊन पुढची योजना त्यांना कळवून एकटाच निघालो 3rd पॅचला. जवळ जवळ 15-20 मिनिटांच्या रनिंगवर येऊन पोहचलो. 3rd पॅच म्हणजे उंबराच्या झाडाचा रॉक पॅच! त्याला पारखून घेतल्यावर हा आपल्या आवाक्यातला आहे असे म्हणून वर कड्यावर थांबलेल्या पोराला निरोप दिला आणि मी खालच्या पोरांची वाट बघत विश्रांतीसाठी आडवा झालो. अर्धा तास झाला, पाऊन तास झाला तरी यांचा आपला खालून एकमेकांचा गौरव करण्याचा आवाज येतोय. इथे वरुन मी यांना आवाज देतोय तर यांचा खालून काही रिप्लाय नाही. मग आता यांची वाट बघण्याशिवाय काही गत्यंतर नव्हता. तेवढ्यात डोळे मिटतोय न तोवर एक जोराचा धाड करुन आवाज आला आणि एकदमच नळीची शांतता भंग पावली. माझ्या काळजाचा ठोका चुकला. मनात काही नाही ते विचार येऊ लागले. मग यांना थोडं खाली उतरुन मोठ-माठ्याने आवाज द्यायला सुरुवात केली. नंतर स्वप्निलचा रिप्लाय आला आणि सगळे सुखरुप आहेत हे ऐकून एक जोराचा सुस्कारा टाकला. स्वप्निलची बॅग पाडली होती या महाशयांनी.

## • तिसरा रॉकपॅच :

पुढे अर्ध्या तासाने ही पोरं वर आली. आता आमची चढाई होती उंबराजवळच्या 3rd पॅचची. इथे मी माझ्या कंबरेला रोप बांधून तिरकी चढाई करुन वर गेलो आणि बाकीच्यांना रोप खाली सोडली. तो पर्यंत 6.15 झाले होते आणि त्यानंतर एक एक जणू हळूहळू कासवासारखा वर येत होता. आता इथे दिवस मावळतीला आलेला. आणि घाई करुनही चालणार नव्हते कारण सगळ्यांचीच जाम दमछाक झाली होती.




तिसरा रॉकपॅच उंबराजवळचा...

Youtube Link :- https://youtu.be/abx3sN1jRLI

मी जिथे उभा होतो तिथून सरळसोट उभी नळी दिसत होती आणि ती पाहून काळजात धडकी भरत होती. त्यात खाली लक्ष गेले तर दिसले की काही पोरं मोबाईलची टॉर्च दाखवून नळीच्या सुरवातीच्या तोंडाकडून इशारा करत

होती. पण त्यांचा आवाज काही ऐकू येत नव्हता आणि इशारा म्हणजे समजण्याच्या पलिकडचा!

जवळ जवळ अर्धा तास सिध्दू, राहूल, अनिकेत, दिनेश आणि भैयाला वर काढायला लागला आणि त्यात 6.45 झाले आणि अंधार पडू लागला. आता आपल्याला वर जाईपर्यंत काळोख होणारच याची अनुभूती आली.

- **मदतीचा हात :**

मी उंबराजवळ उभा राहून बाकीच्यांना वर घेत होतो, तेवढ्यात दोन पोरं धडपडत वर आली आणि त्यांनी मला आवाज देऊन आमच्या मदतीसाठी आडवी झाली.

तशी माझी नजर स्वप्निल आणि मॅडी कडे वळली. इथे खरं तर आधीच माझी अवस्था सह्याद्रीने आणि आमच्या मित्र परिवाराने पार आडवी होण्याच्या मार्गावर करुन ठेवलेली. (इथे खरं तर मला मदत करण्याची इच्छा होतीच पण सूर्य मावळतीला जातोय आणि थोड्याच वेळात आम्ही पण फसणार याची चिंता लागलेली.) शेवटी माणूसकीने माझ्या मनावर ताबा मिळवला आणि मी आपल्या पोरांना वर घेऊन त्या दोघांमधील एकाला वर घेण्यासाठी रोप दिली आणि त्यांची बाकीची माणसं येईपर्यंत वर वाट पाहत राहिलो. (इथे एक चूक झाली आणि ती म्हणजे किती पोरं टोटल यायची बाकी आहेत ते मी विचारलचं नव्हतं. नंतर त्याच्यासोबत झालेल्या संभाषणातून समजलं की 10 पोरं अजून यायची बाकी आहेत..) त्यांचा कंपनीचा ग्रुप होता त्यात बहुतेक अनुभव नसलेली माणसे होती, काही तर अगदी पन्नाशी ओलांडलेली आणि त्यात त्यांना चुकून जिपवाल्याने खूबी फाट्याला सोडायचं तर वल्हिवले गावात आणून सोडलेलं.

# रात्र दुसरी - 23 डिसेंबर 2017
## (RANGE SEEN)

दरीत आता काळोख पसरायला सुरवात झालेली... आमची सगळीच पोरं पांगलेली आणि मला कळून चुकले की आता काळोखात पुढचा प्रवास नको, मदत घ्यावी. मी कामा दादाला कॉल केला, Mobile range problem... तरी संभाषण पुढीलप्रमाणे... थोडक्यात....

**कामा दादा :** हा, हॅलो कोण?...

**मी :** हा कामा दादा मी विशाल बोलतोय.... सकाळची आठ पोरं नळीच्या वाटेने निघालेली ना तीच....

**कामा दादा :** हा बोला.... बोला....

**मी :** अहो... आम्ही अडकलोय इथे 3rd पॅच वर... आता रात्र पण झालीय... पुढचा प्रवास धोक्याचा वाटतोय...

**कामा दादा :** अहो तुम्ही तर सकाळीच निघालात ना मग अजून नाही पोचलात? (आता यावर मी काय बोलणार! आमची पोरं किती चपळ आहेत ते कसं सांगावं!)

**मी :** हो पण आम्ही इथे 3rd पॅचला आलोय वर चढून आणि खालून मदतीसाठी आवाज दिलाय दुस-या ग्रुपने, त्यांना बाहेर काढायला वेळ लागलाय. त्यांना रोप पाठवली आहे, ते येतीलच थोडक्यात....

**कामा दादा :** पण, गावातली माणसं भेटली ती म्हणतात तूम्ही दारु पित होतात म्हणून? (हे ऐकून मी एकदम शॉक! हे तर असं झालं म्हणजे सूर्य रात्रीचा उगवलाय असा आरोप!)

**मी :** नाही हो! हे कूणी तुम्हाला सांगितलं ? आमच्याकडे ग्लूकॉन-डी च्या बाटल्या आहेत, तीच दारु वाटली असेल त्यांना.... आम्ही ट्रेकमध्ये नशाबाजीला थारा देत नाही.

**कामा दादा :** ठिक हाय... मी तर मग आता तुम्ही उंबराजवळ पोचलात काय?

**मी :** हो, उंबरा जवळचा पॅच चढून वर आलोय आणि दुस-या ग्रुपची वाट बघतोय!

**कामा दादा :** मग तूम्ही पोचलात की.......... आता सरळ असच मागच्या दिशेने वळसा घालून जा मग गेलात तूम्ही वर

**मी :** हो, पण मी तो रस्ता बघितलाय! काळोख आहे... काही पोरं यायला घाबरत आहेत आणि दुसरा ग्रुप चढेल की नाही शंका आहे... तूम्ही कोणाला तरी पाठवा प्लीज....

**कामा दादा :** मी खाली गावात हाय, ................. पण वरुन कोणाला तरी पाठवतो....... पण तो पर्यंत तूम्ही थांबा, तरी तास-दिड तास लागेल....

**मी :** ठिक हाय! Thank you दादा...."

आता वरुन मदत येईल हे ऐकून खूपच हायसं वाटलं. तेवढ्यात मॅडीने खबर दिली की यांच्या ग्रुप मध्ये पिऊन आलेले आहेत. तसा मी आणि स्वप्निल खबळलो आणि स्वप्निल ने तर firing चालू केली. त्यांचा लीडर आशिष तिवारीला बोलवलं आणि विचारलं. त्याने मान्य केलं की ग्रुपमधील काही माणसं पिऊन आली आहेत. हे ऐकताच त्याला झणझणीत शिव्या हासडल्या... मग सगळा माफिनामा झाला, पद्मदर्शन झालं आणि मग त्यांना असच रात्रभर अर्ध्या दरीत कुठे सोडून देणार या विचारानं वर घ्यायचं ठरवलं पण दुसया दिवशी त्यांना झोडपून काढण्याचे ठरले पण सकाळीच ती पोरं आम्ही उठण्या अगोदर पसार झाली...

तेवढ्यात त्यांची खालून उरलेली सगळी माणसं आली आणि 3rd पॅच जवळ खाली त्यांना थांबवण्यात आलं आणि आम्ही वर 8 + 2 जण...

सह्याद्रीचे ते काळेभिन्न रौद्र भीषण कडे त्या काळरात्रीत अजूनच भयंकर वाटत होते आणि खाली पहावं तरी नुसता काळोखच. फक्त कल्पना करत होतो, दिवसभरात चढलेलो आणि त्या उंबराजवळ उभं राहून खाली सरळसोट पाहिलेली दरी आणि आता काहीच दिसत नाहीये. Total blank!!!

आता कितीतरी वेळ आम्हाला मदत येईपर्यंत त्या दरीच्या नाकावर बसून काढायचा होता. तिथे कामा दादांचा गैरसमज दूर करण्यात आम्ही सफल झालेलो. पण आता या नाकावर रुसवा आणून बसलेल्या काळरात्रीवर आम्हाला मात करायची होती.

आता ग्रुपमधल्या सगळ्यांची सहनशक्ती संपत आलेली. कंठातून आवाज सुकत चाललेला, थोड्या थोड्या वेळांनी सारखी विचारपूस होत होती. प्रश्न वेगवेगळे पण चिंता मात्र एकच, “कधी येतेय मदत?” काहींचा नळीच्या कातळकड्यांवर बॅटरी चमकावून इशारा देण्याचा प्रयत्न होता... काही गुडघ्यात मान घेऊन बसलेले.... काही एकटक आभाळाकडे बघत होते... आणि खालून तिवारी ग्रूपचा गोंगाट “अरे हमे भी ले लो ऊपर... ऐसे हाथ पे हाथ रखकर क्या कर रहे हो, कुछ तो करो यार... फोन लगाओ किसी को...” आणि यावर स्वप्निल आणि भैयाचे भन्नाट गौरवोद्गार....

आता खूप वेळ झालेला... सर्व पोरं चांगलीच पांगली होती... शांत झालेली आणि तेवढयात डावीकडून बॅटरीचा एक प्रकाशाचा झोत आमच्या डोळ्यांवर पडला आणि बघतोय तर काय, डोक्यावर हेडटॉर्च आणि खांद्यावर रोप घेऊन भास्कर दादा आला.... मदत आली ..........!!! सगळ्या पोरांमध्ये उत्साह आणि पाठून आमच्या अनिकेतच्या तोंडून आपसुकच उमटले...“आले, गणपती बाप्पा आले...!”

भास्कर दादाशी बोलणी झाल्यावर तसेच वर एकदम 20 जणांना (त्यांचे 12 आणि आम्ही 8 जण) जागा होणार नाय म्हणून आम्ही 8 जणांनी Traverse क्रॉस करुन पूढे जायचे ठरले.

आता आमचे मरगळलेले खेकडे अगदी सश्यासारखे पळत होते... ना कसली भीती आणि नाही कोणताच थरथराट! (राव, हेच तर आहे आपल्या मनमिळाऊ भास्कर दादाचं वैशिष्ट्य!)

पुढल्या दिड तासात आम्हाला 3 रॉक पॅच लागले. शेवटचा पॅच वर चढून आम्ही कोकणकड्याच्या सपाट कातळकड्यावर पोचलो आणि मग भास्कर दादाच्या झोपडीत जाऊन गरमागरम बटाट्याची आमटी भात, भाकरी, ताकाची कढी हासडून घेतली आणि तिथेच आमच्यासाठी एक तंबू वाटच बघत होता. त्यात 4 पोरं झोपली आणि दुस-या आम्ही घेऊन आलेल्या तंबूत बाकीची 4 झाली आडवी...

## दिवस दुसरा - 24 डिसेंबर 2017

कोकणकड्यावर सकाळ झाली ती इथे सूर्योदय बघायला सगळ्या महाराष्ट्रातून आलेल्या ट्रेकर्सचा किलबिलाटाने आमची झोपमोड झाली. पण इथे उठतंय कोण? सकाळी 9.00 वा. उठले सगळे. चहापाणी झाला आणि बॅगा भास्करदादाच्या झोपडीत ठेऊन कोकणकडा निरखून घेतला आणि काल याच नळीच्या वाटेने आम्ही वर आलोय हे बघून प्रफुल्लित झालो.



हॉटेल कोकणकडा...

## • कोकणकडा :

कोकणकडा म्हणजे हरिश्चंद्रगडाचे सर्वात मोठं आकर्षण. त्यावरुन पाहिले असता कोकणाचे दर्शन होते त्यामुळे त्याचे नाव कोकणकडा ठेवले असावे. तो सरळसोट काळाकभिन्न असून त्याचा आकार अर्धगोलाकार आहे.



हाच तो कोकणकडा... याकरीताच केला होता अट्टाहास...

## • डोलाची घुमटी :



ग्रुप फोटो...

## • हरिश्चंद्रेश्वराचे मंदिर :

हरिश्चंद्रेश्वराचे मंदिर हे अत्यंत जुने आणि पौराणिक असून दगडी बांधकामाचे आहे. मंदिराच्या प्रवेशद्वारावर एक घंटा असून मंदिरासमोर नंदी आहे. मंदिरावरील नक्षीकाम अत्यंत सुरेख आहे. कित्येक वर्षे चांगदेवांनी तप केलेली जागा मंदिराच्या मागील बाजूस आहे. प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूला श्री गणेशांची दगडी मूर्ती आपल्याला पहावयास मिळते. मंदिराच्या गाभा-यात

लावलेल्या उदबत्त्यांचा सुवास सबंध मंदिरात दरवळत होता. सद्य स्थितीला तिथे दोन साधू महाराज वास्तव्यास असल्याचे समजले.



हरिश्चंद्रेश्वराच्या मंदिराचे प्रवेशद्वार...





कोकणकड्यावरुन हरिश्चंद्रेश्वराच्या मंदिराकडे जाताना काढलेला फोटो...



मंदीराच्या मागील बाजूस वास्तव्यास असणारे साधू महाराज...




मंदीराच्या मागील बाजूस असणारी चांगदेवाची तप करण्याची जागा...



हरिश्चंद्रेश्वराच्या मंदीरातील शिवलिंग...



हरिश्चंद्रेश्वराचे मंदिर...

- **हरिश्चंन्द्रेश्वराच्या मंदिरातील कोरीव नक्षीकामः**







कोरीव नक्षीकाम...



## • केदारेश्वराची गुहा :

हरिश्चंद्रेश्वर मंदिराच्या उजव्या बाजूला केदारेश्वराची गुहा आहे. त्यात कंबरभर बर्फतुल्य पाणी असून गुहेत 1 मीटर उंच आणि 2 मीटर लांब असे शिवलिंग आहे. शिवलिंगाभोवती पूर्वी चार दगडी खांब अस्तित्वात होते पण, सद्य स्थितीला एकच खांब दिसतो. असे म्हणतात की, हे चार खांब म्हणजे चार युग आहेत आणि त्यातील उरलेला एक खांब हा सध्याच्या कलियुगाचे प्रतिक आहे. शिवलिंगाची पूजा अर्चा केली जाते आणि त्या निर्माल्यामुळे गुहेतील पाणी दूषित झाले आहे.



केदारेश्वराचे स्थान...



केदारेश्वराचे स्थान आणि बर्फतुल्य कंबरभर पाणी...

## • गणेश गुहा आणि मेरची गुहा :

हरिश्चंद्रेश्वर मंदिराच्या डाव्या बाजूस आपल्याला काही गुंफा दिसतात. त्यापैकी एका गुंफेत श्री गणेशांची भली मोठी कोरीव मूर्ती आहे म्हणून त्यास गणेशगुहा असे म्हणतात आणि बाजूलाच मेरची गुहा आहे. आपल्या भारतीयांना जशी ऐतिहासिक वास्तूंवर नावे लिहून चिरकाळ विजय मिळवल्याचा भास होतो, त्याप्रमाणे येथे ही खूप सैराट प्रेमींनी आणि शिवरायांच्या नावाचा फक्त घोषणेपुरताच आदर असणा-यांनी आपल्या नावाचा उदो उदो केलाय. गडावर जाणा-या प्रत्येकांनी असे टवाळकी भेटल्यावर त्यांना धोपटून काढण्याची खबरदारी घ्यावी.



कोरीव गणेशगुहा...

(गणपतीचा शोध पेशव्यांनी लावलाय असे म्हणणाऱ्या काही ॲन्टी-हिंदू लोकांना सणसणीत चपराक...)



ऐतिहासिक वास्तुंची दुरावस्था...




कर्तृत्व दाखवून या शिवप्रेमीं जुन्नर ग्रुपने गाजवलेला पराक्रम...

- **परतीचा प्रवास :**

वेळेअभावी आम्ही तारामती शिखर, बालेकिल्ला, इ. points सोडून गडावरच असणा-या दुकानातून लिंबू सरबत पिऊन टोलारखिंड मार्गे खिरेश्वरला निघालो परतीच्या प्रवासासाठी. मध्येच एका गुहेत आम्ही दुपारचे जेवण उरकून घेतले. अनिकेतने आणलेला चणा मसाला आणि भैयाने आणलेला खाकरा खाऊन घेतला आणि निघालो पुढच्या दिशेला.



सुरू झालाय परतीचा प्रवास...



टोलार खिंड आणि दुरवर दिसणारा पिंपळगाव जोगा धरण



टोलारखिंडीत आपल्याला एक व्याघ्रशिल्प दिसते. त्या जवळच असणा-या दुकानात आम्ही कोकम सरबतचा आस्वाद घेतला.



टोलार खिंडीतले व्याघ्रशिल्प...



व्याघ्रशिल्पाजवळच थोडा आराम आणि सेल्फी...

टोलारखिंड उतरुन खूबी फाटा हे अंतर 6 किमी. आहे. खूबी फाट्याला जाण्यासाठी एक रस्ता पिंपळगाव जोगा धरणाच्या काठाने जातो आणि दुसरा उजवे वळण घेऊन नागेश्वर मंदिराच्या बाजूने असणा-या पायवाटेने सरळ खूबी फाट्याला पोचतो.



परतीच्या प्रवासातली पाठमोरी टोलारखिंड...

## • नागेश्वराचे मंदीर :

हरिश्चंद्रगडावर जाताना खिरेश्वर गावातून अदमासे एक कि.मी. अंतरावर खिरेश्वराचे प्राचीन शिवमंदिर आहे. हे अकराव्या शतकातील यादवकालीन मंदिर आहे. मंदिराच्या बाहेरील सभामंडप छताला शिल्प पट्टिका बसवलेली आहे. आतील गाभारा असलेल्या दाराच्या माथ्यावर शेषयायी विष्णू व परिवाराचे अप्रतिम कोरीव शिल्प आहे. मूषकवाहन मकर-रती, अशा अनेक कोरीव प्रतिमा येथील पाषाणावर आढळतात. या मंदिराला नागेश्वराचे मंदिर असेही म्हणतात.

**वेळे अभावी आम्ही नागेश्वर मंदिराचे दर्शन दुरुनच घेतले....**



नागेश्वराचे मंदीर...

मावळत्या सूर्यासोबत माळशेज घाटाचे नयनरम्य दृश्य डोळ्यांसमोर ठेवून आम्ही पोचलो खूबी फाट्याला 6.45 ला. आणि नंतर शिर्डी-संगमनेर-कल्याण एसटी पकडून आम्ही निघालो कल्याणला...



लगबग चाललीय तिन्हीसांजेची...



## • हरिश्चंद्रगडाचा इतिहास :

उंची : 4000 फूट

चढाईची श्रेणी : मध्यम (नळीच्या वाटेने आणि साधले घाटाने कठीण)

दिशा : पूर्वेस पैठण-कोतूळ
पश्चिमेस वल्हीवले-भैरवगड-ठाणे
दक्षिणेस माळशेज-नाणेघाट-जुन्नर-पुणे
उत्तरेस रतनगड-भंडारदरा-अहमदनगर

हरिश्चंद्रगड हा ठाणे पुणे आणि नगर जिल्हयांच्या सीमेवर माळशेज घाटाच्या डावीकडे उभा असणारा अजस्र डोंगर आहे. १७४७-४८ मध्ये हा किल्ला मराठ्यांनी मोगलांकडून घेतला आणि किल्लेदार म्हणून कृष्णाजी शिंदे यांची नियुक्ती केली.

हरिश्चंद्र तारामती आणि रोहिदास अशी येथील शिखरांची नावे असल्यामुळे या किल्ल्याचा संदर्भ थेट राजा हरिश्चंद्रापर्यंत स्थानिक दंतकथांनी जोडला आहे. हरिश्चंद्रगडावरील लेण्यांत चांगदेवांनी तपश्चर्या केली होती.

## • जाण्याच्या वाटा :

### ➢ खिरेश्वरकडील वाट:-

खिरेश्वरकडील वाट सोपी असल्याने लोक हरिश्चंद्रगडावर जाण्यासाठी साधारणपणे ही वाट घेतात. मुंबई-जुन्नर असा राजरस्ता माळशेज घाटातून जातो. या घाटाच्या माथ्यावर खुबीफाटा आहे.

पुण्याहून आळेफाटामार्गे अथवा कल्याणहून मुरबाड-माळशेज घाट मार्गे खुबीफाट्यास उतरता येते. खुबी फाट्यावरून धरणावरून चालत गेल्यावर ५

कि.मी. अंतरावर खिरेश्वर गाव लागते. तसेच पुण्याकडून खिरेश्वरपर्यंत एस.टी. बसेसचीही सोय आहे. या गावातून दोन वाटा गडावर जातात.

- एक वाट ही तोलार खिंडीतून सुमारे ३ तासात गडावरील मंदिरापर्यंत पोहचवते.
- दुसरी वाट ही गडावरील जुन्नर दरवाजाला पोचते. ही वाट पूर्वी प्रचलित होती. आता मात्र वाटाड्याशिवाय या वाटेने गडावर जाऊ नये. या मार्गाने जाताना गावातील विहिरीतून पाणी भरून घेतले पाहिजे कारण वाटेत कुठेच पाणी नाही.

## ➢ पाचनईकडील वाट:-

हरिश्चंद्रगडावर जाण्याची एक वाट पाचनई मार्गे अहमदनगर जिल्ह्यातूनही आहे. यासाठी मुंबई-नाशिक हमरस्त्यावरील घोटी या गावी उतरावे. तिथून संगमनेरमार्गावरील राजूर या गावी जावे. राजूरवरून गडावर दोन मार्गांनी चढाई करता येते.

राजुर-पाचनई अशी बससेवा उपलब्ध आहे. हे अंतर सुमारे २९ कि.मी. भरते. पाचनई हे गडाच्या पायथ्याचे गाव असून येथून गड गाठण्यास सुमारे ३ तास लागतात. वाट फारच सोपी आहे. पाचनई ते हरिश्चंद्रेश्वराचे मंदिर हे अंतर सुमारे ६ कि.मी. आहे.

हल्लीच राजूर ते तोलार खिंड अशी खाजगी वाहनसेवा उपलब्ध झाली आहे. ही वाट राजूर, अंबीत, पाचनई, मुळा नदीचे खोरे, घनचक्कर या बाळेश्वर रांगेतील टेकडीस वळसा घालून सरळ एक तासात तोलारखिंडीत पोहचते. येथून वर जाणारा रस्ता हा दमछाक करणारा आहे. येथून २ तासात गडावरील मंदिरात पोहचता येते. पायथ्यापासून तोलार खिंडीत पोहोचेपर्यंत तास दीडतास लागतो. वाटेत कोठेही पाणी नाही. त्यामुळे येतानाच पाण्याच्या बाटल्या सोबत बाळगाव्या लागतात. हा सर्व परिसर जंगलाचा आहे. या भागात वाघाचा

वावरही असतो असे सुचविणारे एक वाघाचे शिल्प असलेला दगड तोलार खिंडीत उभा केलेला आहे. खिंडीतून पुढे वाट कोथळ्याकडे जाते. खिंडीच्या पश्चिमेकडे कड्यावर चढणारी वाट आपल्याला हरिश्चंद्रच्या माथ्यावर घेऊन जाते. खिंडीतून चढणाऱ्या वाटेवर खडकात पायठण्या खोदलेल्या आहेत. येथून अर्ध्या तासातच आपण तटबंदीच्या आत पोहोचतो.

## ➢ नळीच्या वाटेने (डाव्या/ उजव्या):-

मुरबाड माळशेज घाटमार्गे स्वतःचे वाहन असल्यास मोरोशी फाटयाने 11 किमी सरळ वाल्हीवले-बेलपाडा गावात यावे नाहीतर मोरोशी फाटयावरून खासगी जिप करावी.

माळशेज घाटमार्गे जाणी या एसटीने सावरणे गावात उतरून 4 किमी अंतर चालून वाल्हीवले-बेलपाडा गावात यावे. नळीच्या वाटेने जाताना सोबत गावातून गाईड घेऊन जावे.

## • पोहचण्यास वेळ :

नळीच्या वाटेने 12 ते 14 तास

खिरेश्वरने 4 तास

पाचनईने 3.30 तास

## • पाहण्याची ठिकाणे :

1. कोकणकडा
2. हरिश्चंद्रेश्वर मंदिर

3. केदारेश्वर गुहा

4. गणेश गुहा मेरची गुहा

5. तारामती शिखर

6. डोलाची घुमटी

- **पाण्याची आणि जेवणाची व्यवस्था :**

गडावर पाण्याची आणि जेवणाची व्यवस्था आहे तसेच हॉटेल्स आहेत. वाटेतून जाताना सोबत पाणी असावे.

- **आजू बाजूची ठिकाणे :**

➢ नागेश्वर मंदिर

➢ नाणेघाट

➢ जीवधन

➢ माळशेज घाट

➢ रतनगड आणि कात्राबाईचा डोंगर

➢ भैरवगड आणि आजोबाचा डोंगर



## * समाप्त *